## MAHARASHTRA ACT No. XIV OF 1983

### THE ADMINISTRATORS-GENERAL AND OFFICIAL TRUSTEES (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1982

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २४ फेब्रुवारी १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एस. ए. धोले,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XIV OF 1983

### AN ACT TO AMEND THE ADMINISTRATORS-GENERAL ACT, 1963 AND THE OFFICIAL TRUSTEES ACT, 1913, IN THEIR APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १ मार्च १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४

### महाप्रशासक अधिनियम, १९६३ आणि शासकीय विश्वस्त अधिनियम, १९१३ हे महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम

१९६३ चा ४५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाप्रशासक अधिनियम, १९६३ आणि शासकीय विश्वस्त अधिनियम, १९१३, हे महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करणे इष्ट आहे ;

१९१३ चा २. **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेहेतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाप्रशासक व शासकीय विश्वस्त (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८२ असे म्हणता यईल.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अमलात येईल.

सन १९६३ चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

२. महाप्रशासक, अधिनियम, १९६३ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या कलम ४३ मध्ये पुढील परंतुकाची भर घालण्यात येईल :— १९६३ चा ४५.

"परंतु मुंबई स्थानिक निधी हिशोब तपासणी अधिनियम, १९३० यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील, आदेशाद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, राज्याच्या महाप्रशासकाच्या सर्व किंवा कोणत्याही लेख्यांची लेखा परीक्षा, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एक किंवा अनेक मुदतीसाठी आणि अशा रीतीने, मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी प्रतिनियुक्त केलेल्या एका किंवा अधिक अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल आणि कलम ४४ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने ते त्याच्याकडून किंवा त्यांच्याकडून प्रमाणित करण्यात येतील." १९३० चा मुंबई २५.

सन १९१३ चा अधिनियम क्रमांक २ याच्या कलम १९ ची सुधारणा.

३. शासकीय विश्वस्त अधिनियम, १९१३ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या कलम १९ मधील पोट-कलम (१) मध्ये पुढील परंतुकाची भर घालण्यात येईल :— १९१३ चा २.

"परंतु मुंबई स्थानिक निधी हिशोब तपासणी अधिनियम, १९३० यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, राज्यास शासकीय विश्वस्तांच्या सर्व किंवा कोणत्याही लेख्यांची लेखा परीक्षा, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एक किंवा अनेक मुदतीसाठी आणि अशा रीतीने मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी प्रतिनियुक्त केलेल्या एका किंवा अधिक अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल आणि पोट-कलम (२) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने ते त्याच्याकडून किंवा त्यांच्याकडून प्रमाणित करण्यात येतील." १९३० चा मुंबई २५.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.